3 0 OCT 2025
सकाळ

# माझे गाव, माझा देश भावना जोपासा

## कर्नल सावंत; शिवाजी विद्यापीठात वीर नारी दीपावली संमेलन

■ सकाळ वृत्तसेवा




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील 'वीर नारी दीपावली' स्नेहसंमेलनास कर्नल अमरसिंह सावंत, डॉ. व्ही. एन. शिंदे, शोभा पाटील, सविता बिरांजे, अलका दीदी आदी उपस्थित होते.

कोल्हापूर, ता. २९ : 'माझे गाव, माझे राज्य, माझा देश' ही भावना प्रत्येकाने मनात जोपासणे आवश्यक आहे, सैनिकांचा नेहमी आदर केला पाहिजे. माजी सैनिक समाजात सतर्क राहून लोकांना शिक्षित करून शिस्त, स्वच्छतेचे धडे देऊन देशसेवा करू शकतात,' असे प्रतिपादन कर्नल अमरसिंह सावंत यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ, विनायक दळवी चॅरिटेबल फाउंडेशन, एसएसडी ट्रस्ट आणि ब्रह्मकुमारी यांच्यातर्फे शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागातील निलांबरी सभागृहामध्ये आयोजित 'वीर नारी दीपावली' स्नेहसंमेलनात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते.

अलकादीदी म्हणाल्या, 'देशाच्या सीमेवर देशरक्षणासाठी उभे असलेल्या शूर सैनिकांमुळे आपण सर्वजण आनंदी आणि सुरक्षित जीवन जगत आहोत. आपल्यामधील विकृत गोष्टींचा त्याग करून एकमेकांप्रती आदरभाव, एकोपा निर्माण करणे आवश्यक आहे.'

कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, 'विद्यापीठात शहीद जवानांच्या स्मृतिप्रीत्यार्थ क्रांती वनाची निर्मिती केली आहे. विद्यापीठातर्फे शहिदांच्या पाल्यांना शिक्षणात भरीव सवलत, शिष्यवृत्ती दिली जाते.' रोहिणी गंभीर यांनी प्रास्ताविक केले. कीर्तिचक्र प्राप्त शहीद हवालदार शिवाजी कृष्णा पाटील यांच्या वीरपत्नी शोभा पाटील आणि 'बीएसएफ' राष्ट्रपतिपदक प्राप्त शहीद अशोक बिरांजे यांच्या वीरपत्नी सविता बिरांजे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार झाला.

वीरपुत्र जोतिबा पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. आरोग्य विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. अजय चंदनवाले यांनी ऑनलाइन मार्गदर्शन केले. 'व्हीडीसीएफ'चे अध्यक्ष प्रा. विनायक दळवी यांनी 'फौजी की दिवाली' कविता सादर केली.

यावेळी डॉ. पी. डी. राऊत, सहायक जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कॅप्टन सुभाष डोंगरे, आबा कांबळे, डॉ. सागर डेळेकर आदी उपस्थित होते. 'एसएसडी' ट्रस्ट चिपळूणचे अध्यक्ष डॉ. गुलाबराव राजे यांनी सूत्रसंचालन केले.

3 0 OCT 2025
पुण्यनगरी

# माझा देश ही भावना प्रत्येकाने जोपासावी

## कर्नल अमरसिंह सावंत यांचे आवाहन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**



माझे गाव, माझे राज्य, माझा देश ही भावना प्रत्येकाने आपल्या मनामध्ये जोपासणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन कर्नल अमरसिंह सावंत यांनी केले. शिवाजी विद्यापीठ, विनायक दळवी चॅरिटेबल फाऊंडेशन, एस. एस. डी. ट्रस्ट आणि ब्रह्माकुमारी यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात वीर नारी दीपावली स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

जिल्ह्यातील शहिदांच्या पत्नी व मातांचा सत्कार करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कर्नल सावंत म्हणाले, देशाला सर्व बाजूंनी शत्रू राष्ट्रांचा वेढा आहे. देशाच्या रक्षणार्थ शत्रूंची घुसखोरी रोखण्यासाठी सीमेवर सैनिक आपल्या जीवाची पर्वा न करता सदैव तत्पर असतात. त्यांचा नेहमी आदर केला पाहिजे. प्रजापिता ब्रह्माकुमारी अलका दीदी म्हणाल्या, शूर सैनिकांमुळे आपण आनंदी आणि सुरक्षित जीवन जगत आहोत.

कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, विद्यापीठाने शहिदांच्या पाल्यांना शिक्षणामध्ये भरीव सवलत दिलेली आहे. तसेच शिष्यवृत्ती योजनेचा लाभही दिला जातो. व्हीडीसीएफचे अध्यक्ष प्रा. विनायक दळवी यांनी 'फौजी की दिवाली' कविता सादर केली. मान्यवरांच्या हस्ते किर्तीचक्र प्राप्त शहिद हवालदार शिवाजी कृष्णा पाटील यांच्या वीरपत्नी शोभा पाटील आणि बीएसएफ राष्ट्रपती मेडल प्राप्त शहिद अशोक बिरांजे यांच्या वीरपत्नी सविता बिरांजे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शहीद हवालदार शिवाजी पाटील यांचे वीरपुत्र ज्योतिबा पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

प्रास्ताविक रोहिणी गंभीर, तर डॉ. सागर डेळेकर यांनी स्वागत केले. डॉ. गुलाबराव राजे यांनी सूत्रसंचालन केले. ऑनररी कॅप्टन सुभाष डोंगरे यांच्या, तसेच पाकिस्तानचे शेवटचे बंकर उद्ध्वस्त करून भारताला विजय प्राप्त करून दिलेल्या कॅप्टन जग्गी आणि कॅप्टन कॉरी यांच्या टीमच्या तेजस्वी पराक्रमाची गाथा मांडली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. पी. डी. राऊत, तसेच कॅप्टन सुभाष डोंगरे यांनी योगदान दिले. कार्यक्रमास सैनिक, माजी सैनिक, वीरनारी, आबा कांबळे, एस. एस. डी. ट्रस्टचे कार्यकर्ते, विद्यार्थी उपस्थित होते.

30 OCT 2025
सकाळ

# विद्यापीठाच्या विविध बारा परीक्षेचे अर्ज भरा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर (हिवाळी सत्रातील) परीक्षांचे अर्ज भरण्याच्या तारखा परीक्षा व मूल्यमापन मंडळाने आज जाहीर केल्या. त्यात विविध बारा अभ्यासक्रमांचे परीक्षा अर्ज अतिविलंब शुल्कासहीत भरण्याची मुदत १२ नोव्हेंबरपर्यंत आहे. बी. टेक. एनईपी., एमसीए (इंजिनिअरींग), एम. टेक (सीबीसीएस), एम. टेक (वायसीएसआरडी), बी. आर्किटेक्चर, एमबीए., एमबीए ऑनलाईन, बॅचलर ऑफ फाईन आर्टस (अप्लाईड आर्ट अँड क्राफ्ट) या अभ्यासक्रमांचे परीक्षा विनाविलंब शुल्कासह भरण्याची मुदत सहा नोव्हेंबर, तर विलंब शुल्कासहीत अर्ज भरण्याची मुदत दहा नोव्हेंबरपर्यंत आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या प्री-एक्झाम विभागाचे सहायक कुलसचिव डॉ. के. ए. गुरव यांनी दिली.

3 0 OCT 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खो-खो स्पर्धेत इचलकरंजीच्या नाईट कॉलेजला विजेतेपद

## शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय पुरुष खो-खो स्पर्धा : आष्टा संघ ठरला उपविजेता : वाळवा संघाला तिसरे स्थान

प्रतिनिधी
इचलकरंजी

येथील नाईट कॉलेजच्या खेळाडूंनी जिद्द, संघभावना आणि चपळाई दाखवत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आयोजित आंतरविभागीय पुरुष खो–खो स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी, रोटरी क्लब हेरिटेज आणि इनरव्हील क्लब यांच्या सहकार्याने इचलकरंजी येथे झालेल्या या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात नाईट कॉलेज, इचलकरंजी आणि आर्टस् कॉमर्स कॉलेज, आष्टा या दोन बलाढ्य संघात अटीतटीची लढत झाली. शेवटी यजमान नाईट कॉलेजच्या संघाने केवळ एका गुणाच्या फरकाने आष्टा संघावर मात करत विजेतेपदाची नोंद केली.



इचलकरंजी : विजेत्या संघास पारितोषिक वितरण करताना संजय घायतिडक, निवेद धनघानिया, संदीप लाहोटी, विभा पाटणी, इशा खडिलवाल, प्राचार्य डॉ. विरुपाक्ष खानाज व मान्यवर.

पहिल्या डावात नाईट कॉलेजच्या खेळाडूंनी आष्टा संघाचे आठ खेळाडू बाद केले, तर प्रतिस्पर्धी आष्टा संघाला इचलकरंजी संघाचे सहा खेळाडू बाद करता आले. त्यामुळे नाईट कॉलेजने दोन गुणांची आघाडी घेतली.

दुसऱ्या डावातही नाईट कॉलेजच्या खेळाडूंनी उत्कृष्ट बचावात्मक खेळ करत आष्टा संघाचे पुन्हा आठ खेळाडू बाद केले. आष्टा संघाला विजयासाठी ११ खेळाडू बाद करणे आवश्यक होते, मात्र त्यांनी केवळ नऊ खेळाडू बाद केले. त्यामुळे इचलकरंजी संघ अवघ्या एका गुणाच्या फरकाने विजेता ठरला.

अंतिम सामन्यात नाईट कॉलेजच्या अजय कश्यप, विराज गळतगे, विकास देशमाने यांनी भक्कम बचाव केला, तर वैभव निपाने आणि शुभम मकोटे यांनी आक्रमण करत आष्टा संघाच्या खेळाडूंना बाद केले. आष्टाच्या ओमकार पाटील, गोरक्षनाथ पाटील आणि विवेक पाटील यांनी उत्तम खेळ सादर करत प्रेक्षकांची दाद मिळवली, मात्र त्यांचा प्रयत्न अपुरा पडला.

### मान्यवरांच्या हस्ते गौरव

विजेत्या व उपविजेत्या संघांना रोटरी क्लबचे अध्यक्ष संजय घायतिडक, निवेद धनघानिया, संदीप लाहोटी, इनरव्हील क्लब अध्यक्षा विभा पाटणी, इशा खंडेलवाल, प्रकाश रावळ आणि प्राचार्य डॉ. विरुपाक्ष खानाज यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आले. तृतीय स्थानासाठी झालेल्या सामन्यात के. एन. पी. कॉलेज, वाळवा संघाने पतंगराव कदम कॉलेज, रामानंदनगरवर १८ विरुद्ध १३ अशा पाच गुणांच्या फरकाने विजय मिळवला.

दरम्यान, या स्पर्धेतूनच नांदेड येथे होणाऱ्या 'अश्वमेध' राज्यस्तरीय स्पर्धेसाठी तसेच एसएनडीटी विद्यापीठ, मुंबई आणि सी.आर.एस. युनिव्हर्सिटी, हरियाना येथे होणाऱ्या अखिल भारतीय अंतरविद्यापीठ खो–खो स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष व महिला संघांची निवड करण्यात येणार आहे. स्पर्धेत एकूण ४०० खेळाडूंनी सहभाग नोंदवला.